RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# कराड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील स्वच्छतगृह व पिण्याच्या पाण्याच्या सुविधेतील समस्या आणि उपाय

**डॉ. सुधीर कुंभार,**
क.भा.पाटील विघालय व ज्यु. कॉलेज,
ढेबेवाडी ता. पाटण जि. सातारा

**श्री. आनंद गणपत पळसे**
विस्तार अधिकार,
पंचायत समिती,कराड जि. सातारा

'बलकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षाणचा हक्क अधिनियम, 2009 भारतभर 1 एप्रिल 2010 पासून आमलात आला याची मागणी कित्येक वर्षापासून विविध प्रकारे चालू होती. आर टी ई 2009 मध्ये अनेक नियम व अटी, कलमे नमूद करण्यात आली आहेत. बालकाला शिक्षणाचा हक्क आहे त्या शिक्षण प्रकियेत त्यालाही काही हक्क आहेत. त्यास सुविधा देणे बंधनकारक आहे. अभ्यासक्रम, परीक्षा, मुल्यमापन, कौशल्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया याबरोबरच ज्या वातावरणात तो शिकणार आहे ज्ञान मिळवणार वा निर्माण करणार आहे त्या वातावरणाचा अनुकूल परिणाम त्याच्यावर होत असतो. त्याला मिळणा–या सुविधा या आसपासच्या परिसरात असतात त्यापेक्षा भिन्न असतात. कराड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एका बीटातील प्राथमिक शाळांची पाहणी केली असता. त्यांना मिळणा–या स्वच्छतागृह व पाण्याच्या सुविधांबाबत शिक्षक व व्यवस्थापनाने काही बाबी पुरविल्याचे संशोधनात लक्षात आल्या. स्वच्छतागृह बंद असण्याची शक्यता, स्वच्छ पिण्याचे पाणी असण्याची शक्यता भिन्न शाळात भिन्न असते. त्यांची कारणे जरी विविध असली तरी या समस्या स्थानिक पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न कांही ठिकाणी होतो. मात्र काही ठिकाणी याबाबी दुर्लक्षीत केल्या जातात.

आर टी ई 2009 नुसार स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यासुविधा मिळण्याचा हक्क बालकाला मिळालाच पाहिजे यासाठी प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, समाजसेवी संस्था, अध्यापकांनी एकत्रीत प्रयत्न करणे आवश्यक आहे. या सुविधा शासनस्तरावर देण्यासाठी आणि एन सी एफ 2005 मधील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न व्हावेत.

आर टी ई 2009 नुसार शाळा मान्यतेसाठी स्व–प्रतिज्ञापत्र नमुना नियम 11 अंतर्गत भरुन दयावा लागतो. त्यात खूपशा सुविधा बालकाला आनंददायी व ताणरहीत शिक्षण मिळावे यासाठी देण्यात आलेले आहेत. हे दिसून येते. प्रत्यक्षात यासुविधा शिक्षकांनी व संस्थानी दयाव्यात ही अपेक्षा.

**प्रस्तावना**

भारत सरकारने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क व अधिनियम, 2009 दिनांक 1 एप्रिल 2010 पासुन आमलात आणला. त्यास 5 वर्षे पूर्ण होत आली आहे. मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत ब्रिटीश सरकारपुढे मागणी करणा–या म. ज्योतीबा फुले यांच्यापासुन आता पर्यंत अनेकदा हा विचार कृतीमध्ये आणण्यासाठी अनेक शिक्षण संस्थानी, शिक्षण तज्ज्ञांनी व विविध शिक्षण आयोगानी अट्टाहास धरला होता. आर टी ई 2009 लागु करताना अनंत अडचणी दिसुन आल्या. भारतीय समाजाची जडघडण ज्या पध्दतीने विकसीत झाली आहे. त्यात मिळतजुळते घेण्यावर खुपदा एकमत होते. प्रशासन, समाज, राजकीय व्यवस्था या आप–आपल्या हिताचा त्यात विचार करतात. त्यातून मूळ ढांचा तसाच राहिल याकडे लक्ष दिले जाते. यासाठी अनेक पळवाटा शोधल्या जातात. प्रस्तूत शोधनिबंधात आर टी ई नुसार आवश्यक सुविधा देण्यातील अडचणी, असमर्थता याकडे दुर्लक्ष केले जाते. याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आहे. या सुविधा देण्यात शिक्षकांना व व्यवस्थापकांना अडचणी येतात त्यावर लागुपुरता उतारा म्हणून सुविधा पुरिवल्याचे पुरावे अनेकदा दिसुन येतात. सुविधा देण्याच्या उपाययोजना करावयाच्या असल्यास त्या स्थानिक पातळीवर भिन्न–भिन्न स्वरुपाच्या आहेत. सर्व सुविधा सर्वांना देणे आवश्यक नाही. मात्र परीक्षा शासनाच्या सदहेतूची असून वैज्ञानिक पध्दतीचा वापर झाल्यास प्रत्येक शाळेने परिशिष्ट 2 नुसार फॉर्म 1 व्दारे दिलेले प्रतिज्ञापत्र योग्य ठरेल. सुविधा देण्यासाठी निधी उपलब्ध नसतो. 1968 च्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणातील गुंतवणुक 6 टक्कया पर्यंत वाढवावी. अपु–या गुंतवणुकीचे परिणाम भयानक होतील. तसेच ती अपायकारक ठरु शकते. असा इशारा त्या काळात दिला होता. आताही सुविधासाठी निधी अपुरा आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**उद्दिष्टये**

1. प्राथमिक शाळामध्ये स्वच्छतागृहे व पुरेशा पाण्याची व्यवस्था उपलब्ध आहे का शोधणे.
2. वर्षभर पिण्यासाठी पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध असते का हे शोधणे.
3. निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक रसायने दररोज वापरली जातात का हे पाहणे.
4. शिक्षक व व्यवस्थापनाला आर टी ई नुसार सुविधा देताना येणा–या अडचणी शोधून त्यावर उपाय सूचविने.

**व्याप्ती व मर्यादा**

कराड तालुक्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या 309 शाळांपैकी व 24 केंद्रा पैकी सुपने बीटातील 3 केंद्रातील 43 शाळांपुरते मर्यादित.

**गृहितक**

सर्व शाळांना आर टी ई 2009 नुसार सुविधा देण्यात अडचणी आहेत. त्यावर उपाय योजनांसाठी शिक्षक व व्यवस्थापनाने एकत्र प्रयत्न केल्यास त्या सुविधा उत्कृष्ट पध्दतीने कार्यरत राहतील.

**कार्यपध्दती**

सुपने बीटातील 3 केंद्रातील 43 प्राथमिक शाळांतील प्रत्यक्ष भेटीतून स्वच्छतागृह आणि पिण्याच्या पाण्याबाबत प्रत्यक्ष आर टी ई नुसार सुविधा कशा आहेत त्याची पाहणी करणे. त्यातील त्रुटी शोधणे. तसेच शिक्षक व व्यवस्थापनाच्या मुलाखाती घेणे. त्यासुविधा देण्यातील अडचणी जाणून घेवून उपाय योजना सुचविणे.

**माहितीचे संकलन व पथक्करण**

आर टी ई 2009 निकषाप्रमाणे स्वच्छतागृह असणा–या शाळा

मुलीसाठी – 307

मुलासाठी – 306

43 पैकी 43 शाळात सुविधा उपलब्ध आहेत असे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

**स्वच्छतागृहात कायमस्वरुपी पाणी उपलब्ध असणा–या शाळा. नळजोडणी टाकी कायमस्वरुपी. स्वच्छतेसाठी** स्वच्छता कर्मचारी नेमणुक – कोठेही नाही. स्वच्छतागृहे स्वच्छ करण्याचे काम विधार्थी व शिक्षकच करतात

**शौचालय, मुतारी आउटलेट**

योग्य –शोषखड्डा, ड्रेनेजमध्ये सोडलेल्या शाळा संख्या –100 टक्के

अयोग्य – उघडयावर सोडलेल्या शाळा संख्या –0 टक्के

**साधनांचा वापर**

| टॉयलेट प्रिपरेशन कीट उपलब्ध | नेहमी / कधीकधी |
|---|---|
| फिनॉल | कधीकधी |
| ॲसिड | कधीकधी |
| हॅडवॉश | कधीकधी |
| साबण | कधीकधी |

**शौचालय कायम उघडे असावीत असा निर्णय असताना शौचालय बंद असतात. त्यापाठीमागिल कारणाची टक्केवारी.**

| वपरात नसण्याचे कारण | टक्केवारी | नाही पैकी टक्केवारी |
|---|---|---|
| नादुरुस्त स्वच्छतागृह | 04 | 28.6 |
| अस्वच्छ दुर्गंधी असल्याने | 02 | 14.3 |
| जण्याचा मार्ग अस्वच्छ | 02 | 14.3 |
| बंद दरवाजा | 03 | 21.4 |
| पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही | 03 | 21.4 |
| एकूण | 14 | 100 |

**स्वच्छतागृहांचा दरवाजा असल्यास चावी कोठे! कुणाकडे असते?** मुख्याध्यापक शिक्षक विधार्थाकडे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**स्वच्छतागृहासाठी पर्यायी व्यवस्था मुले,मुली कोणती निवडतात**

- निर्जन ठिकाण
- भिंतीच्या अडोशाला
- गटारीत
- इतरत्र

**पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत**

गावाच्या व शाळेचा पिण्याचा पाण्याचा स्त्रोत एकच असणा–या शाळा संख्या–

| | | |
|---|---|---|
| बोअरवेल | – | 02 |
| विहीर | – | 00 |
| नळपाणीपुरवठा | – | 41 |
| इतर | – | 00 |
| | | ––––– |
| एकूण | – | 43 |

**पाणी नमुना तपासणी**

सहा महिन्यातून एकदा पाणी पिण्यायोग्य आहे का याची तपासणी करणे आवश्यक आहे. तपासणी करुन घेणा–या शाळा–

| तपासणी प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शासनामार्फत तपासणी | 00 | 00 |
| खाजगीयंत्रणेमार्फत तपासणी | 02 | 05 |
| त्पासणी होत नाही | 41 | 95 |
| एकूण | 43 | 100 |

**पाणी साठवणूक कशात करतात**

| प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पाण्याची टाकी | 38 | 88 |
| पिंप | 04 | 09 |
| अन्य | 01 | 03 |
| एकूण | 43 | 100 |

**शुध्द जल पुरविण्यासाठी अनेक शाळांना जलक्षुध्दीकरण यंत्रणा कांही योजनातून मिळाले आहे.**

| प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| जलमणी यंत्र | 09 | 21 |
| वॉटर प्युरिफायर | 22 | 52 |
| कॅडलयुक्त साधे फिल्टर | 08 | 18 |
| जल शुध्दीकरण यंत्रणा नाही | 04 | 09 |
| एकूण | 43 | 100 |

- पाण्याची टाकी आठवडयातनू एकदा स्वच्छ करुन कोरडी करण्या–या शाळा संख्या– 80 टक्के
- पाण्याचे निर्जंतुकीकरण कशाने करतात याची पाहणी केली असता प्राप्त माहिती

| प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| TCL पावडर | 08 | 28 |
| TCL गोळया | 00 | 00 |
| TCL द्रव | 30 | 70 |
| निर्जंतुकीकरण करत नाहीत | 05 | 12 |
| एकूण | 43 | 100 |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

- पाणी साठवणूकीची जागा, पाणी पिण्याच्या जागी स्वच्छता राखली जाणा—या शाळा संख्या—70 टक्के
- सांडपाणी वापरुन परसबाग, बाग फुलविणा—या शाळांची संख्या– 25 टक्के

वरील सर्व निरीक्षणावरुन विविध शाळात विविध समस्या असल्याचे आढळून येते. त्या सोडविण्यासाठी शासनाबरोबर शिक्षक व व्यवस्थापनाला शक्यतोवर प्रयत्न करावे लागतात.

**शिक्षक व व्यवस्थपनापुढील अडचणी**

- आर्थिक अडचणी– सुविधासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध नाही.
  स्वच्छता कर्मचारी नियुक्त करता येत नाही.
- अपु—या जागेची अडचण– शाळेजवळ अतिरिक्त जागा नाही.
- स्वच्छता, निर्जंतुकीकरणाची रसायने, साबण, हॅंडवॉश कायम स्वरुपी पुरविली जात नाहीत. एक्सपायरी होण्याची शक्यताही असते.

**निष्कर्ष**

1. निकषाप्रमाणे कराड तालुक्यातील शाळात स्वच्छतागृहे आहेत. मात्र सातत्याने स्वच्छतागृह वापरात असणा—या शाळांची संख्या—67 टक्के
2. स्वच्छतेसाठी कर्मचारी नसल्याने अपुरी स्वच्छता असते
3. टॉयलेट प्रिपरेशन किट वर्षभर उपलब्ध नसते. कधी कधी उपलब्ध होते. काही ठिकाणी शिक्षक स्वखर्चाने उपलब्ध करुन देतात.
4. ग्रामीण भागात बंद शौचालयांची संख्या सुमारे – 07 टक्के आहे. विविध कारणांनी बंद असतात मुले आपली पर्यायी व्यवस्था निवडतात.
5. पिण्याचे पाणी साठवणुक होते निर्जंतुकीकरणाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.
6. 95 टक्के शाळांची पाणी तपासणी होत नाही. शाळा व्यवस्थापनाकडून केली जात नाही.
7. जलशुध्दीकरणाची यंत्रणा पुरविल्याच्या शाळांतून ही यंत्रणा 100 टक्के चालू आहे. विघार्थी त्याचा वापर करतात.
8. पिण्याच्या पाण्याबाबत काळजी घेण्यात येते. तेथील स्वच्छतेकडे 70 टक्के शाळा लक्ष देतात.

**उपाय व शिफारशी**

1. स्वच्छतागृहात पाणी पूर्णवेळ असावे
2. स्वच्छतागृहे स्वच्छ असावित व बंद न ठेवता उपलब्ध राहावीत.
3. पिण्याचे पाणी स्वच्छ असावे कायमस्वरुपी पुरविण्यात यावे.
4. बांधकाम व इतर सुविधात लोकसहभाग हवा. मंडळांनी, दानशूर व्यक्तींनी, शाळांना, स्थानिक पातळीवर आर्थिक मदत करावी.
5. स्वच्छतेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने कर्मचारी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009, महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद (विदया परिषद), पुणे—30, फेब्रुवारी 2013
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यालयाकडे संपादक, म. रा.शै.सं. व प्रशिक्षण परिषद पुणे—30, मे 2002
- राष्टीय अभ्यासक्रम आराखडा, 2005 एन.सी.इ.आर.टी, दिल्ली, डिसेंबर 2009
- यू—डाएस स्त्रोत कराड तालुका शिक्षण विभाग